# लहानपण दे गा देवा

कधीकधी मी लहान असल्याचे मला फार दुःख होते. काल रात्री मला वाटले की मी मोठे व्हायला हवे. असा विचार करतानाच मी झोपलो. सकाळी जागा झालो. आरशात पाहतो तर काय, माझ्या हनुवटीवर दाढी होती. मग मला दाढी करावी लागली. दाढी करणे मुळीच सोपे नसते. मला गालावर कापले आणि रक्त आले.

कामावर जाण्यासाठी मला गाडी चालवावी लागली. मी गाडी वेगात चालवली. तरीही मला कामावर पोहोचायला उशीर झाला. दिवसभर मी गळ्यात टाय घातला होता. त्यामुळे मला कसेतरीच वाटत होते.

संध्याकाळी घरी आलो तर जेवण तयार नव्हते. मलाच जेवण तयार करायला लागले. मग मी वरण-भात बनवला. वरण-भात ताटात काढला. चुकून ताट हातातून निसटले. सगळा भात सांडला. काय त्रास आहे!

आता मला वाटते आहे की उद्या सकाळी मी परत लहान मुलगाच व्हायला हवे.

~~~

1. खालील जोडाक्षरे लिहा. जोडाक्षरांचा वापर केलेल्या धड्यातील शब्दांना गोल करा. नवीन शब्द शोधून लिहा.

   त् + र = त्र ------------------------------------------------------------

   त् + य = त्य ------------------------------------------------------------

   व् + ह = व्ह ------------------------------------------------------------

   क् + त = क्त ------------------------------------------------------------

   ळ् + य = ळ्य ------------------------------------------------------------

© Triveni Marathi Shala, Cincinnati, OH
~~~

2. खालील शब्द वापरून वाक्ये तयार करा.

मुळीच, उशीर, बनवला, निसटली, त्रास

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

3. खालील वाक्ये पूर्ण करा.

------------------------------------------------------------------------- आणि रक्त आले.

संध्याकाळी घरी आलो तर ---------------------------------------------------------------

4. क्रियापदाचे योग्य रूप निवडा

अ) बाबा रोज दाढी (करतो / करते).

आ) आई गाडी (चालवतो / चालवते).

इ) ताई शाळेतून घरी (आला / आली).

ई) बशी खाली (पडला / पडली).

उ) अनिकेत गाणे छान (गातो / गाते).

5. विचार करा आणि सांगा: तुम्हाला मोठं व्हावं असं वाटतं का? का?

© Triveni Marathi Shala, Cincinnati, OH